RESEARCH PAPER | History | Volume : 6 | Issue : 5 | May 2016 | ISSN - 2249-555X | IF : 3.919 | IC Value : 74.50

# आचार्य विनोबा भावे यांचा स्वातंत्र्य संग्रामातील सहभाग

KEYWORDS: Neurosis, feeling, depression.


| Prof.Dr.Kailash Nagulkar | Ku.Pravina V.Kakade |
|---|---|
| Gulam Nabi Azad College,Barshi Takali, Akola. And Ku.Pravina V.Kakade, Research Scholar | Research Scholar |


प्रस्तावना :–

भारताच्या पारतंत्र्याच्या प्रदीर्घ कालावधीत भारतात जे घडले ते विलक्षणच होते. इंग्रज साम्राज्याचा पाश देशाच्या गळयाभोवती जसजसा घटट आवळला जात होता तसतसा भारतीय प्रतिमेला बहर येत होता. या काळात अनेक महापुरूष, साधक, तत्वचिंतक, समाज सुधारक निर्माण झाले. अगदी राजाराम मोहनरॉय पासून आगरकर, टिळक, महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे या थोर माणसांची मा. लिकाही पारतंत्र्याचीच देणगी आहे. विनोबाजी एक सच्चे देशभक्त होते. देशासाठी आणि समाजासाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. गांधीच्या प्रेरणेने त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय सहभाग घेतला.

लहानपणी विनोबांवर देशात त्याकाळी झालेल्या राजकीय घडामोडींचा परिणाम होत होता. आधीच देशात ब्रिटिश राजवटीविरूध्द असंतोष माजला होता. त्यात 1905 ची वंगभंगाची चळवळ व 1908 मध्ये लोकमान्य टिळकांना झालेली सहा वर्षाच्या अमानुष शिक्षेची भर पडली. त्यावेळी लोकमान्यांची प्रमुख राष्ट्रनेत्यांत गणना होऊ लागली होती. तरूणांची तर त्यांच्यावर भक्ति होती. ''केसरी'' हे वत्तपत्र सुरू होवून बरीच वर्ष लोटली होती विद्यार्थ्यांतही ''केसरी'' फार लोकप्रिय होते. 'केसरी' तून होणारी लोकमान्यांची सिंहगर्जना सर्वांनाच कर्तव्याची जाग आणीत होती. विनोबाही 'केसरी' अगदी तत्परतेने वाचून विचारात मग्न होत. वैराग्यशील जीवन जगायचे आणि स्वातंत्र्यसंग्रामात भाग घ्यायचा या दोन ध्येयांनी ते भारले होते. गांधीजींच्या प्रेरणेने स्वातंत्र्याच्या महायज्ञात विनोबांनीही आपली आहुती टाकली.

झेंडा सत्याग्रह :–

बापुनी आज्ञा द्यावी आणि विनोबांनी त्या आज्ञेचे पालन करावे असेच जीवन कार्य आजवर विनोबांचे सुरू होते. वर्धा येथील आश्रमात विनोबांच्या तालमीत अनेक अनुयायी देशकार्यासाठी तयार झाले होते. वर्धा येथील जमनालालजींचा जेष्ठ मुलगा कमलनयन देखील विनोबाजींचा शिष्य म्हणून आश्रमात काही वर्ष राहीला गांधीजी वर्षातून एक महिना या आश्रमात निवास करीत आश्रमाच्या स्थापनेपासूनच असहयोग आंदोलनाने वर्धा परिसरात तीव्रता धारण केली. राष्ट्रीय जागृतींच्या कार्यास गती प्राप्त झाली पुढील सर्वच आंदोलनामध्ये सत्याग्रह आश्रमाने मोठे योगदान दिले. आश्रमवासियांचे पहिले मोठे आंदोलन म्हणजे नागपुरचा झेंडा सत्याग्रह अखिल भारतीय स्वरूपाचा हा पहिलाच सत्याग्रह आणि तो झेंडयाच्या निमित्ताने सुरू झालेला. राष्ट्राने पहिले निशाण या सत्याग्रहारूपाने रोवले. ता. 18 मार्च 1923 हा दिवस महात्माजींच्या कारागृहवासाचा स्मृतिदिन होता. सर्वत्र हिंदुस्थानांत हरताळ पडला होता. जबलपुरला संध्याकाळी राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक निघाली. झेंडा हाती घेणे म्हणजे कायदेभंग करणे असे त्यावेळी इंग्रज सरकार मानत होते. त्यावेळी हा सत्याग्रह झाला पण सरकारने अटक करून नंतर स्वयंसेवकांना सोडून दिले पुढे जालियनवाला बागेच्या स्मरणानिमित्त अशीच मिरवणूक निघाली. राष्ट्रीय निशाणाच्या या मिरवणुकीला सिव्हिल लाईन मधुन म्हणजे ''सभ्य वस्तीमधून'' जाण्याला सरकारने बंदी केली व झेंडा घेऊन जाणाऱ्यांना पोलिसांनी बेशुध्द पडेपर्यंत बेदम मार दिला.

झेंडा सत्याग्रह हे स्वातंत्र्य आंदोलनातील एक यशस्वी उपाख्यान मानावे लागते निर्धार अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ती व शिस्त या निकषावर हा सत्याग्रह विशेष खुलुन दिसतो. या सत्याग्रहामुळे वल्लभभाई पटेल, त्यांचे बंधु विठ्ठलभाई व जमनालालजींची प्रतिमा सुशोभित झाली. राष्ट्रीय पुढाऱ्यांमध्ये त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले. जमनालालजींच्या नेतृत्वाखाली नागपूर सत्याग्रह समितीने नेत्रदीपक कार्य केले. पोलिस बळास व दडपशाहीस न घाबरता जमनालालजींच्या नेतृत्वाखाली शेकडो स्वयंसेवक कारावासात गेले. जमनालालजींना दीड वर्षाची शिक्षा झाली. अल्पावधीत एक मोठे जन आंदोलन उभे राहिले. जमनालाजींनी तार करून वर्ध्याहून स्वयंसेवक मागविले आणि सत्याग्रहाच्या आघाडीवर जाण्याचा लाभ आश्रमवासियांना मिळाला एकामागून एक स्वयंसवेक जमु लागले. मध्य प्रांतातल्या तालुक्या तालुक्यातून स्वयंसेवकाची रीघ लागली. सर्व हिंदुस्थानभर या झेंडा सत्याग्रहाच्या प्रकरणाने हलकल्लोळ उडाला. गुजरात, बंगाल, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, मद्रास, सगळीकडचे स्वयंसेवक जमू लागले. 18 जुन 1923 रोजी नागपूरच्यासभेत आचार्याचे भाषण झाले. लोकांवर त्यांचा विलक्षण प्रभाव पडला. ''ब्रिटीश सरकार केवढही बलिष्ठ असो, सत्याग्रहापुढे ते नमलेच पाहिजे'' अशी सिध्दांताची सिहंगर्जना तेथे झाली. अशा तऱ्हेचे जळजळीत आणि युक्तिवादाने परिपूर्ण असे विनोबाजीचे ते भाषण ऐकूण हाच आमचा खरा पुढारी अशी स्वयंसेवकांची खात्री पटली त्याच दिवशी मध्यरात्री विनोबासह सर्व स्वयंसेवकांना अटक करून नागपूरच्या अजनी जेलमध्ये नेण्यात आले. जेलमध्ये कुणाला चक्की, कुणाला कागद कुटणे, कुणाला केतकी कुटणे, कुणाला खडी फोडणे अशी कामे मिळाली. आचार्यांना जेलमध्ये केतकी कुटण्याचे काम मिळाले. एकांतवासाच्या को. ठडीत त्यांना ठेवण्यात आले. नंतर त्यांचे अकोला येथील जेलमध्ये स्थानांतर झाले. तेथे त्यांना गिट्टी फोडण्याचे काम मिळाले. तेथील अनेक अन्यायाला आचार्यांने सहजतेने सहन केले. पुढे जेलमधील कैदी तसेच अधिकारीही आचार्यांसमोर विनम्र. तेने नमु लागले. मग वेदाची पुस्तके मागविली गेली. जेल लायब्ररीमधलीही पुस्. तके तेथे जमा झाली. असे सर्व ज्ञानसाहित्य जमा झाले. जेलमधल्या मंडळीत नाना तऱ्हेचा विचार विनिमय होई. सतरा ठिकाणची मंडळी एके ठिकाणी अशी जमा होणे शक्य नव्हते या जेलच्या योगाने त्यांना परस्परांजवळ येवून भरपूर विचार विनिमय करण्याचा वेळ मिळाला आणि आचार्यासारखे मार्गदर्शक मिळून त्या विचार विनिमयात आणखी बिनचुकपणाची भर पडली. आचार्य जेलमध्ये प्रत्यक्ष समोर रात्रंदिवस अगदी जवळच होते. त्यामुळे जेलचे रूपांतर साधकांच्या आश्रमात झाले.

चळवळीचा वाढता जोम पाहून चळवळीचे नैतिक तेज पाहून सरकारला नमते घेणे भाग पडले आणि 3 सप्टेंबर 1923 रोजी अकोल्यातील सर्व मंडळी सुटून गेली मग आश्रमामध्ये आचार्यासह सर्वांनी प्रवेश केला. ज्या आश्रमात एक दोन विद्यार्थीच राहिले होते तो आश्रम आता एकाएकी माणसांनी गजबजुन गेला आचार्यांचा आश्रम पाहण्यासाठी आता नागपूर जेलमधून सुटलेली मंडळीही एकामागून एक धाव घेऊ लागली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विजयोत्साहाचे तेज, प्रत्येकाच्या ऱ्हदयात आचार्याविषयी आदर होता.

दांडी यात्रा :–

सन 1930, हिंदुस्थानभर जिकडे तिकडे जागृतीचा महापूर आलेला होता. महात्माजींच्या ''दांडीकूचचा'' सर्व राष्ट्रभर विलक्षण परिणाम झाला होता. आबाल वृध्द सर्वांना उत्साहाने भारून टाकले होते. नवजीवन व यंग इंडिया या दोन वर्तमानपत्रांतून पुढील आत्मबिलदानाची कल्पना सर्व हिंदुस्थानावर हळूहळू पसरत होती. बापूजींचे लेख जनता आणि सरकार दोघांनाही जागृत करीत होते. देशभरातील जागृती पाहिल्यावर सरकारने महात्माजींना पकडले. क्रमाक्रमाने सर्वत्र मिठाचे व अन्य सत्याग्रह सुरू झाले. 50/50 हजार लोकांचा जमाव जमू लागला. लोकांच्या आज पर्यंतच्या केवळ जडवृत्तीचे चैतन्यांत रूपांतर झाल्याने हा अनुभव प्रत्येकाला काही तरी प्रेरणा देत होता.

ज्याला जे जे शक्य ते त्याने राष्ट्रांसाठी करावे ही प्रेरणा सर्वत्र पसरली होती. त्यामुळे आचार्यांनी वर्धा आश्रमातर्फे पाठविलेल्या प्रचारकांनाही खेडयातील लोकांशी मिसळून त्यांना कार्यप्रवण करण्याची ही मोठीच पर्वणी अनायासे चालून आल्यासारखे झाले. जिकडे तिकडे तालुक्यात आचार्यांना प्रिय असणारी तकली उपासना सुरू करण्यात आली. या चळवळीमुळे वर्धा आश्रमाच्या कार्यकर्त्यांना खेडयापाडयात काम करण्याची संधी मिळाली 16/17 हजार तकल्या घरोघरी पोहचविल्यागेल्या हजारो लोक राष्ट्र–सेवेच्या भावनेने सुत कातु लागले. आचार्यांच्या नेतृत्वाखाली खेडयातील जनतेला उपासनाकार्यात मदत करण्याचे कार्य चाले. महात्माजींच्या चळवळींचा जसजसा अविष्कार होत गेला तसतसे त्यांचे सिध्दांत अधिक समजू लाग. ले अशी इतरांची स्थिती होती. आचार्यांनी महात्माजींना कधीच आत्मसात केले होते. त्यामुळे ते येथे पूर्णपणे स्थिर राहिले आणि येथल्या खेडयातल्या सेवेचे कार्य योग्य तऱ्हेने करीत राहीले. आचार्य जेथे होते तेथे त्यांच्या भोवतालच्या खोलकामाचे ते एकमेव अग्रणी होते. महात्माजींना दक्षिण आफ्रिकेपासून आतापर्यंत आचार्यांच्या तोडीचा सत्याग्रही मिळालाच नव्हता. हिंदुस्थानातील सत्याग्रहाच्या आघाडीवर सेनानी म्हणून विनोबा पुढे आले नाही अल्पक्षेत्र घेवून कार्याची खोली वाढविणारे विनोबा हे

Volume : 6 | Issue : 5 | May 2016 | ISSN - 2249-555X | IF : 3.919 | IC Value : 74.50

त्यावेळेचे एकमेव पुढारी होते. त्यांच्या भोवती एकनिष्ठ अनुयायांचे पहिल्या दर्जाचे पथक तयार होते. प्रत्यक्ष महात्माजींच्या सोबत दांडी यात्रेला न जाता आपल्या जागी स्थिर राहुन आसपासच्या लोकात जनजागृती घडवून आणून महात्माजींच्या सत्याग्रहास आचार्यांनी मोठे पाठबळ दिले.

धुळे जेल :–

एका स्मारक समारंभासाठी आचार्य धुळयास आले होते. समारंभ ठरल्याप्रमाणे व्यवस्थित पार पडला. आचार्याचे भाषण झाले. ''नुसती इतिहासाची कागदपत्र, पुरावे अद्ययावत, भव्य इमारतीत ठेवून इतिहास उज्वल होत नाही. आम्ही जर करंट्याप्रमाणे वागलो तर सर्व कागदपत्र भस्म झाल्यासारखीच आहे''. अशा आशयाचे ते भाषण होते. कॉग्रेसच्या प्रमुख मंडळींना पकडून दडपून टाकण्याचा विडा त्यावेळचे व्हा. ईसराय लॉर्ड विलिंग्डन साहेबांनी उचलला होता. यावेळी धुळे जिल्हयातील आसपासच्या खेडेगावात तीनचार कार्यक्रम झाले. आचार्यांनी सरकारी दडपशाहीवर, अन्यायावर, तीव्र शब्दांत प्रकाश पाडण्यास सुरूवात केली. भयभीत मनांना वीरश्रीची स्फुर्ती लाभेल असे आचार्यांचे शब्द सर्वत्र व्याख्यानांतून निनादु लागले. धुळ्याहून जळगावला जात असताना आचार्य पुर्व खानदेशातील प्रमुख कार्यकर्ते श्री अण्णासाहेब दास्ताने यांच्या पिंप्राळे आश्रमात जाण्यास निघाले जळगावचे लोक सरकारकडून पकडापकडी झाल्याने भयभीत होवून गेलेले होते. तेव्हा जळगावला रात्री व्याख्यान करण्याचे निश्चित करून आचार्यांनी तशी सुचना दिली. आचार्य पिंप्राळे आश्रमात पो. हचताच तेथे त्यांना आणि त्यांच्या सोबतच्या सर्व मंडळींना अटक करून जळगावच्या कोर्टाजवळीस 'लॉकअप' मध्ये नेण्यात आले. लॉकअप मधील त्रासाला सीमा नव्हती. अत्यंत अरूंद जागा जवळच पायखाना त्यात किडे पडलेले अशा त्या ठिकाणी सर्व मंडळी 4/5 दिवस कोंबली गेली. लॉकअपच्या ठिकाणी अतिशय किळसवाणा ओंगळपणा होता. अशा या ओंगळ वातावरणात लॉकअपमध्ये आचार्य डोळे मिटून केवळ ध्यानस्थ बसत. या ध्यानबळावरच त्यांनी हा ओंगळपणा सहन केला. या लॉकअपमध्ये 5/6 दिवस काढल्यानंतर पिंप्राळयाच्या बेकायदा संस्थेत जाण्याच्या आरोपावरून आचार्यांना 7 महिने व 50 रू. दंड व इतरांना काही कमी अशी ही शिक्षा सुनावण्यात आली. आचार्यांना चक्कीवर दळण्याचे काम देण्यात आले. आचार्यांच्या वर्तणुकीमुळे जेलर साहेब प्रभावित झाले. आचार्यांच्या वास्तव्यामुळे धुळे जेलमध्ये एकप्रकारे आश्रमाची संस्थापना झाली होती. सर्वांना आनंदी ठेवण्याचा विनोबा प्रयत्न करीत. विनोबा म्हणायचे धुळे तुरूंगात तर मला संतसमागमच लाभला होता. साने गुरूजी, आपटे गुरूजी, जमनालाल बजाज यांच्यासारखी माणसे तिथे होती. या सगळयांनी विनोबास सुचविले की रोज थोडे गीतेवर बोलावे विनोबांनी ते कबुल केले. दर रविवारी ते गीतेवर प्रवचने देवू लागले आणि साने गुरूजींनी ती सारी प्रवचने शब्दशः लिहून घेतली पुढे हीच लिखित प्रवचने देशातील सर्व भाषेत भाषांतरीत झाली गीता प्रवचने पुरुष कैद्यासमोर होत होती. तेंव्हा स्त्री कैद्यांनी मागणी केली की आम्हालाही प्रवचने ऐकायला मिळावी. त्यानुसार जेलरने सर्व कैद्यासमोर विनोबाच्या प्रवचनाची व्यवस्था केली.

याच धुळे जेलमध्ये 1930 मध्ये आचार्यांनी गीतेचे मराठी भाषांतर 'गीताई' लिहिले. 1932 साली जमनालालजींच्या आग्रहास्तव 'गीताई' छापण्यास आचार्यांनी परवानगी दिली. गीतेचे भाषांतर करताना सर्व आयाबहिणींना हा ग्रंथ उपयोगी पडावा व त्यांच्याद्वारे सर्व समाजाचे कल्याण व्हावे ही एक दृष्टी विनोबाजींची होती.

अद्वितिय सत्याग्रही :–

ब्रिटीश सरकारने त्यांचे राज्य म्हणून हिंदुस्थानला न विचारता जर्मनी विरूध्द युध्दात सामील केले आणि सर्व हिंदी लोक स्वेच्छेने युध्दात सामील आहेत असा देखावा निर्माण केला. अहिंसेचे उपासक असणाऱ्या गांधीजीचा कुठल्याही युध्दाला विरोध होता. तेव्हा युध्दात सामील न होण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक होते. हे कार्य करण्यासाठी युध्दविरोधी भाषण स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी संपुर्ण संयमी, संपुर्ण शुध्द, संपुर्ण ईश्वरपरायण, संपुर्ण व्रतसंपन्न कॉग्रेसचे आणि बापूजींचे धोरण संपुर्ण आत्मसात केलेली व्यक्ती म्हणजेच विनोबाजी गांधीजींना योग्य वाटली. त्या संदर्भात गांधीजीनी विनोबाशी चर्चा केली आणि चर्चेअंती वैयक्तिक सत्याग्रहाची अपुर्व योजना जगाला मिळाली. विनोबांनी 1921 ते 1940 च्या दरम्यान अनेकदा तुरूंगवास भोगला परंतु 1940 पर्यंत त्यांची राष्ट्रीय चळवळीतील भूमिका अगदी सामान्य अशीच होती. त्यावर्षी मात्र वैयक्तिक सविनय कायदेभंगाच्या चळवळीसाठी भारतातले पहिले सत्याग्रही म्हणून गांधीजीनी त्यांची निवड केली. विनोबांच्या आयुष्यातला हा ऐतिहासिक प्रसंग होता. श्री जवाहरलाल नेहरूंना गांधीजीनी दुसरे सत्याग्रही निवडले होते. जवाहरलालजी लोकप्रिय राजकीय नेते होते. राष्ट्र कॉग्रेसचे ते एक सामर्थ्यशाली आधारस्तंभ होते. असे असुनही सत्याग्रहापाठीमागील नैतिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ति म्हणून गांधीजींना विनोबाजींची निवड करणे योग्य वाटले. विनोबांची लोकांना स्वाभाविकपणे फारशी ओळख नव्हती. आपल्या 'हरिजन सेवक' मध्ये ''सत्याग्रह'' या सदराखाली बापूजींनी चारस्तंभाचा लेख लिहून त्यामध्ये आपली योजना जाहीर केली. या योजनेमध्ये सत्याग्रही व्यक्तींच्या शुध्दीवर फार मोठा जोर दिला गांधीजीनी आपल्या शिष्याची साऱ्या जगाला ओळख करून दिली. त्यात त्यांनी विनोबांचे मौलिक गुण, विविध कार्य आणि निष्ठा यांचा गौरव केला होता.

शेगांव (सेवाग्राम) आणि वर्ध्याचा सत्याग्रह :–

एकमेवाद्वितीयम अशा कोटीतला पहिला सत्याग्रह पवनारला विनोबांच्या निवासग्रामीच करण्यात आला. हिंदुस्थानभर त्याचा पडसाद उमटून अखिल हिंदुस्थानचे नेतृत्व स्विकारून आलेली तीन महिन्याची सजा 15 जानेवारी 1941 ला संपवून विनोबाजी वर्ध्यास आले. लगेच महात्माजींच्या सल्ल्याने सत्याग्रह करण्याचे ठरले. 17 जानेवारी 1941 ला सुटल्यापासून दोनच दिवसांनी सेवाग्रामला सकाळी 9 वाजता सत्याग्रह ठरला 'हिंदुस्थान खेडयात आहे'' या महात्माजींच्या वाक्याची जणु काय सेवाग्रामला प्रत्यक्ष मुर्तीच घडली जात होती. कार्यक्रमास्थळी आचार्यांनी भाषणास सुरूवात केली. ''माणसाने माणसाला मारू नये इतकी निरूपद्रवी गोष्ट सांगण्याला आज प्रतिबंध होत आहे. बरे जे एकमेकांचे शत्रु आहे त्यांनी लढण्याची तयारी केली आहे. ते शस्त्रास्त्रांनी सज्ज आहेत पण जे निःशस्त्र आहेत. ज्यांचे कुणाशी वैर नाही ते भारतीय लोक आज हॉस्पीटलमध्ये रोगी होवून बसले आहेत. ही इतकी साधी गोष्ट सांगणे सुध्दा आज गुन्हा आहे. ही गोष्ट सांगणे धर्म आहे. मी केवळ धर्म भावनेनेच हे काम स्वीकारले आहे. आपण सर्वांनी आपआपसात एकी करावी. युध्दाला मदत करू नये हरिजनांशी प्रमाणे वागून स्पृश्यास्पृश्यभेद काढून टाकावा'' या आशयाचे विनोबाजींचे भाषण झाले. रात्री वर्ध्यास गांधी चौकात विनोबाचे व्याख्यान होते त्यातही त्यांनी सेवाग्रामच्या भाषणातले मुद्देच विस्ताराने सांगितले उद्या नागझरीला रात्री 9 वा. सत्याग्रहाचा कार्यक्रम आहे, असे जाहीर केल्यावर सभा संपली.

नागझरीचा कार्यक्रम :–

दि. 1941 साली नागझरी या गावी मंडळी जाण्यास निघाली खंडेराव जाधव हे या गावचे धाडसी कार्यकर्ते होते. त्यांचे आश्रमवासियाशी चांगले संबंध होते. 13 जानेवारी 1940 रोजी त्यांचे देहावसान झाले. एक चांगला कार्यकर्ता गेला. मुद्दाम आचार्य नागझरीला येण्याचे हेच मुख्य कारण होते. सायंकाळी विनोबानी व्याख्यानाला सुरूवात केली. आचार्यांना नागझरीतल्या 10–12 संस्थातर्फे सुताचे हार घालण्यात आले. व्याख्यानाचा पुर्व भाग स्वाभाविकपणे खंडेराव जाधवांसबंधी होता. उत्तरार्धात नेहमीचे सर्व युध्द विरोध विषयक मुद्दे तर सांगितलेच पण महत्वाच्या नवीन मुद्याचे या ठिकाणी अविष्करण करण्यांत आले. अहिंसेच्या योगाने शत्रुचा मित्र बनविता येतो, अहिंसेनेही मोठमोठे परिणाम घडवून आणता येतील हा नवीन महत्वाचा मुद्दा हेच नागझरीच्या भाषणाचे वैशिष्टये होते.

सोनेगांवचा सत्याग्रह :. दि. 19 जानेवारी 1941

सोनेगांव हे 200 घरांचे सुमारे हजार वस्तीचे गाव सोनेगांव आबाजी म्हून तालुक्यातील हे प्रसिध्द ठिकाण येथे मंदिराच्या पायऱ्यावर व्याख्याने होत. आजुबाजूचा खेडयातली मंडळी व्याख्यानास आली होती. प्रत्येक व्याख्यानात सामान्य मुद्दे सांगुन रोज एक एक नवीन मुद्दा सांगत जायचा अशा प्रकारे क्रमाने ही सत्याग्रहाची व्याख्याने चालू होती. सोनेगावच्या व्याख्यानास विनोबाजीनी पुढील मुद्दे मांडले ते म्हणाले

''शेतकरी हा कधीही युध्दप्रिय नसतो शेतकरी हा जगाचा पालक आहे पण त्याची या इंग्रजाच्या राज्यात अन्नानदशा झाली आहे इंग्रज येण्यापुर्वी अशी स्थिती नव्हती. इंग्लंडला रोज 13 कोटी रूपये खर्च येतो आहे आपला रोजचा भोजन खर्च माणसी दोनआणे सुध्दा नाही पण या हिशोबाने हिंदुस्थानच्या रोजच्या भोजन खर्चाच्या तिप्पट खर्च इंग्लंड युध्दासाठी रोज करीत आहे. हा पैसा सरकार आणते कुठून ? शेतकऱ्याकडून, बरे याचा उपयोग काय ? तर निरपराधी बायका मुलांवर विमानातून बॉम्ब फेकणे ? इतके असूनही इंग्लडला मदत करा कशासाठी माणुस मारीसाठी ? आम्ही मदत करतो आहे त्यामुळे सर्व चालले आहे आम्हाला न विचारता इंग्रजांनी आम्हाला युध्दात सामील केले आहे. जसा शेतकरी बैलाला न विचारता नांगराला जुंपतो तसा इंग्रजानी आम्हाला बैल बनविले. तेंव्हा युध्दाला विरोध करा स्वावलंबी व्हा. या स्वरूपाचे भाषण झाले.

आगरगावचा सत्याग्रह :– दि. 20 जानेवारी 1941

रोज नवीन गाव, रोज नवीन चर्चा, नवीन विचार हा एक प्रकारचा पर्वकाळ सुरू होता. परंतु प्रत्येक गावी न चुकता तकली उपासना सुरू होती. रात्री 9 ला व्याख्यानमाला सुरूवात झाली विनोबाजी म्हणाले '' आज सत्याग्रह म्हणजे काय व तो कशासाठी हे तुम्हाला समजावून सांगायला मी आलो आहे. आपला अफाट देश, अफाट भाषा, धर्म सर्व भिन्न भिन्न पण आपण एक ठिकाणी नांदतो युरोपात एक धर्म असून ते लोक एकमेकांचे गळे कापुन राहिले आहेत. ते लोक मोठ मोठे शोध लावतात. परंतु समजपणाचा शोध काही त्यांनी अजुन शोधून काढला नाही 25 वर्षापुर्वीच्या लढाईत त्यांनी जर्मनीला चिरडून टाकले त्याचा सुड जर्मनी आता उगवीत आहे. अशा या लढाया वाढतच आहेत. कॉग्रेसही वाढते आहे. पण ती अहिंसेची आहे इंग्रज येण्यापुर्वी हिंदुस्थान सुखी होता. इंग्रजांच्या येण्याने शेतकरी कष्टी बनला. इंग्रजांचे राज्य कसे घातक आहे हे आम्ही रोज अनुभवतो आहोत. लढाईत आम्हाला मदत करा आम्ही तुम्हाला स्वराज्य देवू असे इंग्रज म्हणतात. या लढाईने आमचा तर फायदा नाहीच पण इंग्रजांचाही किंवा दुसऱ्या कोणाचाही नाही पण हे सांगायला सुध्दा सरकार अडवते एवढयासाठीच हा सत्याग्रह आहे. आता सर्वांनी सत्याग्रह करायचा नाही पण प्रत्येक जणाने स्वावलंबनाचा कार्यक्रम करायचा निदान 100 तरी खादीधारी या गावात होवू द्या. हरिजनांचा विटाळ मानू नका, हिंदु–मुसलमानात सलोखा राखा. लढाईपासून दुर रहा'' या आशयाचे भाषण झाले

Volume : 6 | Issue : 5 | May 2016 | ISSN - 2249-555X | IF : 3.919 | IC Value : 74.50

दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम लोणीत ठेवल्याचे जाहीर केले.

लोणीचा सत्याग्रह :– दि. 21 जानेवारी व 22 जानेवारी 1941

लोणी या गावी कुणीही स्वागतास नव्हते. कुणीही मंडळीची राहण्याची व्यवस्था केलेली नव्हती. सर्व लोक पोलिसांच्या भितीने भयभीत झालेले होते. विनोबांनी गावात फिरून गावची व्यवस्था बघितली गावात सभेची व्यवस्था कुणीच करेना. रात्रीच्यावेळी आगरगावची, नागझरीची मंडळी आली. शेवटी गावातील मंडळी येवून बसली व व्याख्यानाला सुरूवात झाली. व्याख्यानांत आचार्यांनी सर्वप्रथम गावातल्या भितीग्रस्त वातावरणाविषयी स्वाभाविकपणे समजुत घातली आणि नंतर मग सत्याग्रहाचे नेहमीचे मुद्दे सांगितले. ''पोलिसांची भीती का बाळगता ते तर जनतेचे सेवक आहे. हिदुस्थानच्या 40 कोटी लोकांवर थोडेसे लोक राज्य करतात याचे कारणही भीती हेच आहे. प्रत्येकाला मरण हे ठेवलेलेच आहे मग भीती कशाची ? जुलमी लोकांचा जुलूम चालतो या ''भीतीवर''

हयानंतर पुर्वीच्या भाषणाप्रमाणे सत्याग्रहाची भूमिका समजावून सांगितली आणि भाषण संपले. दुसऱ्यादिवशी पहाटे पोलिसांनी विनोबांना अटक करून वर्धा येथील तुरूंगात नेले दुसऱ्यादिवशी खटल्याचा निकाल जाहीर झाला. त्यानुसार आचार्यांना एकुण सहा महिन्याची सजा सुनावण्यात आली आणि त्यांना नागपूर जेलमध्ये पाठविण्यात आले.

मूल्यमापन :–

गांधीजींच्या कार्याने प्रभावित होवून आचार्य विनोबाजींनी समाज व देशकार्यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. राष्ट्र विकासाच्या उभारणीसाठी स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्र्योत्तर का. ळात विनोबाजीचे योगदान मोठे आहे. वैयक्तिक सत्याग्रहाच्या लढयामुळे हिंदुस्थान आचार्यांना ओळखु लागला. बहुतेक कार्यकर्ते त्यांच्याकडे आकर्षिक झाले आचार्यांनी जेलमध्ये जे विधायक कार्यक्रमाचे चिंतन कले त्याचाही लाभ अनेक लोकांना मिळ. ाला. गांधीजींच्या मृत्युनंतर त्यांचे अपूर्ण संकल्प पूर्ण करण्याचा त्यांनी संकल्प केला पैशाची प्रतिष्ठा करू नका श्रमाला प्रतिष्ठा द्या म्हणून कांचनमुक्तीचा प्रयोग त्यांनी सुरू केला. स्वातंत्र्योत्तर काळात विनोबांनी राष्ट्र उभारणीच्या विधायक कार्याला वा. हून घेतले त्यासाठी त्यांनी सेवाग्राम येथे गांधीवादी कार्यकर्त्यांचे एक संमेलन भरविले या संमेलनात त्यांनी 'सर्वोदय' समाजाची स्थापना केली सन 1951 पासून विनोबांनी भूदान चळवळीला प्रारंभ केला. अशी ही ऋषितुल्य व्यक्ती 15 नोव्हेंबर 1982 रोजी अनंतात विलीन झाली. मरणोत्तर 1983 साली भारत सरकारने 'भारतरत्न' पुरस्कार देवून त्यांचा गौरव केला.

संदर्भग्रंथसूची :–

1. डॉ. चौधरी कि.का., महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर, वर्धा जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई तिसरी आवृत्ती 1992.
2. भावे शिवाजी, विनोबा जीवनदर्शन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती 1984.
3. बजाज जमनालाल, गो टू नागपूर, यंग इंडिया साप्ताहिक अहमदाबाद 21 जुलै 1923.
4. गांधी, मो.क., हिंद स्वराज्य, नवजीवन मुद्रणालय अहमदाबाद 1990.
5. भावे विनोबा प्रेमपंथ अहिंसेचा, परमधाम प्रकाशन, पवनार वर्धा 2005.
6. गांधी मो.क. 'सिव्हील डिसओबेडियन्स', हरिजन वृत्तपत्र, अहमदाबाद 20 ऑक्टोबर 1940.